सादर :

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या MAHADBT शिष्यवृत्ती पोर्टलवरून विविध शिष्यवृत्तीचे अर्ज भरले होते अशा विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम शासनामार्फत हस्तांतर करणे चालू झाले आहे. त्याअनुषंगाने शासन निर्णय दि. १७.०३.२०२२ अन्वये केंद्र सरकारने प्रती विद्यार्थ्याच्या एकूण शिष्यवृत्ती रक्कमेपैकी ६० % शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्याच्या आधार लिंक बँक खात्यावर दि.१६.०९.२०२२ रोजी हस्तांतरित केलेली आहे. शासनाने ज्या विद्यार्थ्याच्या बँक खात्यावर रक्कम हस्तांतरित केलेली आहे अशी शिष्यवृत्तीची रक्कम रु.५९,७२,९४०/- एवढी असून विद्यार्थ्यांची पहिली यादी शाखानिहाय सोबत जोडलेली आहे.

तसेच उपरोक्त शासन निर्णयानुसार, शासनाने ज्या विद्यार्थ्यांच्या आधार लिंक बँक खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम हस्तांतरित केलेली आहे अशा विद्यार्थ्यांनी सात दिवसाच्या आत महाविद्यालयास सदरची रक्कम जमा करणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या शाखानिहाय विद्यार्थ्यांच्या यादीनुसार सदर विद्यार्थ्यांच्या समोर दर्शवण्यात आलेली रक्कम महाविद्यालयास दि. ०८.१०.२०२२ पूर्वी ONLINE SBI I COLLECT द्वारे जमा करण्यास सांगावे व सदर विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीची रक्कम महाविद्यालयात जमा केल्यानंतर त्याचा सविस्तर अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरून लेखा विभागास दि. १४.१०.२०२२ पूर्वी जमा करावा, जेणेकरून लेखा विभागास पुढील योग्य ती कार्यवाही करणे सोईस्कर होईल, हि विनंती.